# मागे वळून बघताना

६ जून २०२६

सुरेन्द्र दिघे
कार्यकारी विश्वस्त
सरस्वती मंदिर ट्रस्ट,
ठाणे

१९३२ ते १९३८ या काळात रेल्वे लाईनला लागून आणि स्टेशनच्या नजीक असलेल्या भूखंडावर, रेल्वेत सेवा करणाऱ्या मराठी मध्यम वर्गातील व्यक्तीने एकत्र येऊन एक गृहसमूह उभारला. या गृह समुहाला 'ब्राह्मण सोसायटी' हे नाव दिले गेले. पुढील काही काळात, या सोसायटीत असलेल्या लहान मुलांसाठी शाळेची गरज वाटू लागली. ती गरज भाऊ सहस्त्रबुद्धे यांनी पुरी केली. या वस्तीत त्यांनी प्राथमिक शाळा सुरू केली. देशाच्या स्वातंत्र्याचा सूर्योदय होत असताना पुण्याहून ,भौतिक शास्त्राचे प्राध्यापक डॉक्टर चिंतामणी कर्वे, यांनी त्यांची पत्नी सौ. विमलाबाई कर्वे यांना घेऊन ठाण्यात ब्राह्मण सोसायटीत स्थायिक झाले. १९५२ ला भाऊ सहस्त्रबुद्धे यांना काही कारणास्तव प्राथमिक शाळा बंद करावी लागली. सौ. विमलाबाई त्या शाळेच्या पालक होत्या, इतर पालकांप्रमाणे त्यांना पण त्यांच्या मुलाच्या शाळेचा प्रश्न उभा राहीला. अडचण हीच संधी समजून त्यांनी डॉक्टर चिं. श्री. कर्वे, श्री ग. ना. गाजरे , श्री. वि. ग. गोविलकर यांच्या सहकार्याने ६ जून १९५२ रोजी, सरस्वती मंदिर प्राथमिक शाळा सुरू केली. जागेची अडचण नौपाडा हितवर्धिनी या संस्थेने सोडवली. त्यांच्याच जागेत, चार पडदे लावून इ. १ ली ते इ. ४ थी चे वर्ग सुरू झाले. पहिल्या वर्षी एकूण ४६ विद्यार्थी होते.

काल प्रवाहात १९६६ साला पर्यन्त शाळा लोकल बोर्डाच्या अंतर्गत होती. १९६६ साली शाळा आत्ताच्या स्वतच्या मालकीच्या छोट्याशा जागेत स्थलांतरीत झाली. त्याच वर्षी नवीन माध्यमिक विभाग ' सरस्वती सेकंडरी स्कूल ' या नावाने सुरू झाली . पुढील दहा वर्षे , टप्पा टप्याने शाळेची इमारत वाढू लागली. सुरवातीस शाळेला इ. ७ वी पर्यंत लोकल बोर्डाची मान्यता होती. कर्वे बाईंनी प्रयत्न करून १९६९ साली राज्य शिक्षण विभागाची इ. ८ वी ते १० वी पर्यन्त वर्गांची परवानगी मिळवली. त्याच वर्षी इ. ८ वी चे वर्ग सुरू झाले. यासाठी कर्वे बाईंना मो. ह. विद्यालयाचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री. स . वि . कुलकर्णी यांची मोलाची मदत मिळाली होती. १९६८ साली श्री. अशोक टिळक सर सरस्वती सेकंडरी स्कूल मध्ये सेवेत रुजू झाले. १९६९ साली टिळक सरांनी मुख्याध्यापक पदाची जबाबदारी स्वीकारली आणि सरस्वती सेकंडरी स्कूल मध्ये एक नवीन ऊर्जा , उत्साह आणि आकांक्षा निर्माण झाली . कर्वे बाईंनी रुजवलेल्या रोपाची टिळक सरांनी केवळ जोपासना केली नाही तर ते आपल्या सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने , हे रोप फुलवले, फळवले, वाढवले. त्या वृक्षाचा आज वटवृक्ष झालेला आहे, ज्याच्या सावलीत आज अगणित विद्यार्थ्यांनी, केवळ स्वत:चे नाव कमावले नाही तर देशाच्या, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि क्रीडा अशा विविध क्षेत्रात झालेल्या प्रगतीमध्ये हातभार लावलेला आहे.

सरस्वती मंदिर ट्रस्ट हा वाहता प्रवाह आहे. एकविसाव्या शतकातील आव्हाने स्वीकारण्यासाठी, सक्षम आणि सशक्त नागरिक निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी नाविन्याचा ध्यास घ्यायला हवा. इंग्रजी माध्यमांची शाळा, क्रीडा - विज्ञान- सांस्कृतिक केंद्र, प्रज्ञा भाषा केंद्र, छात्रसेना, कृषी शिक्षण , शिकवणी मुक्त शाळा, कला कौशल्य विकास केंद्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वृद्धिंगत केंद्र , हे सर्व उपक्रम मागील तीस वर्षात संस्थेने सुरू केले आहेत. यातील काही उपक्रम अजून बाल्य अवस्थेत आहेत. शाळांची जागेची वाढती गरज बघता, गेल्या दहा वर्षात , संस्थेने सरस्वती विद्या संकुलात दोन उत्तुंग वास्तू उभारल्या आहेत. मला विश्वास आहे की, नजीकच्या भविष्यात, संस्थेचे हे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी, संस्थेचे माजी विद्यार्थी, पालक, हितचिंतक,संस्थेला मदत करतील. या वर्षी संस्थेचा अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत असतान, संस्थेचे ध्येय असणार आहे, ' स्नेह, संवाद , आणि सन्मान ' या भावनांनी संपन्न असलेले सरस्वती मंदिर विद्या संकुल परिपूर्ण करावयाचे आहे.